# मराठवाड्यातील दुष्काळावर ‘इस्राईल’ची उपाययोजना

**मुंबई (प्रतिनिधी) :** मराठवाड्यात सातत्याने दुष्काळी परिस्थिती उद्भवते. यावर उपाययोजना करण्यासाठी इस्राईलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस या शासकीय कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत बुधवारी (ता. १७) मंजुरी देण्यात आली.

सतत उद्‍भवणाऱ्या पाणीटंचाईमुळे २०१६ च्या उन्हाळ्यामध्ये मराठवाड्याला ४००० टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करावा लागला होता. याशिवाय तात्पुरत्या पाणीपुरवठा उपाययोजना हाती घ्याव्या लागल्या होत्या. या दुष्काळी परिस्थितीवर खात्रीशीर व कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून ग्रामीण तसेच शहरी भागाला पाणीपुरवठा करण्याच्या कायमस्वरूपी उपाययोजनांचा आराखडा आखण्यात येत आहे.

मराठवाड्याची तहान भागवण्यासाठी एकूण १७.९२ टीएमसी एवढ्या पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मराठवाड्यातील सर्व शहरे, गावे व वाड्यांना उपलब्ध असलेल्या पाटबंधारे जलसाठ्यांतून ग्रीड पद्धतीने किंवा इतर मार्गांनी पाणीपुरवठा करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने मराठवाड्याला ग्रीडद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ६ डिसेंबर २०१६ रोजी पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली. या कंपनीद्वारे उपाययोजना आखण्यासाठी सरासरी पर्जन्यमान, धरणाची साठवण क्षमता, जलसंधारण, पुनर्वापर, पुनर्चक्रीकरण, नदी खोऱ्यांमध्ये उपलब्ध असणारे पाणी, समुद्राचे पाणी गोडे करणे इत्यादी सर्वंकष प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी इस्राईल सरकारसोबत सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात पुढील प्रक्रिया महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येणार असून इस्राईलचे पंतप्रधान व राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या कंपनीशी सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

### पाणीपुरवठा सक्षम होणार

अत्यंत कमी पर्जन्यमान असूनसुद्धा पाणीपुरवठ्याबाबत सक्षम व्यवस्था उभारण्यात यश आलेल्या मध्य-पूर्वेतील इस्राईलचा अनुभव महाराष्ट्रासाठी उपयोगाचा ठरू शकतो. त्यांच्या याबाबतच्या ज्ञानाचा मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी वापर करण्यात येणार आहे. मराठवाड्याची पाणीपुरवठ्याची सक्षम व्यवस्था उभारण्यासाठी सहकार्य करण्यासाठी इस्राईल सरकारनेही उत्सुकता दाखवली असून इस्राईल शासनाच्या नॅशनल वॉटर कंपनीची उपकंपनी असलेल्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस या कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली. ही कंपनी इस्राईल सरकारचा स्वतःचा उपक्रम असून इस्राईलमधील ८५ टक्के घरगुती पाण्याची व ७० टक्के पाण्याची मागणी या कंपनीद्वारे पूर्ण केली जाते.

# ‘कृषी विद्यापीठांना तंत्रनिकेतनची समस्या कळवू’

**पुणे (प्रतिनिधी) :** कृषी तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांना पदवीच्या दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश न देण्याच्या निर्णयाविरुद्ध संतप्त विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेसमोर द्वारसभा घेतली. ‘‘विद्यार्थ्यांची समस्या सोडवण्यासाठी सहानुभूतिपूर्वक भूमिका घेण्याबाबत कृषी विद्यापीठांना कळविले जाईल,’’ असे आश्वासन कृषी परिषदेचे महासंचालक आर. एस. जगताप यांनी दिले.

कृषी तंत्रनिकेतनच्या १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी कृषी परिषदेच्या प्रवेशद्वाराजवळच सभा घेतली. या वेळी परिषदेचे शिक्षण संचालक डॉ. हरिहर कौसडीकर व विस्तार संचालक डॉ. विठ्ठल शिर्के उपस्थित होते. कृषी तंत्रनिकेतनच्या पदविकाधारकांना कृषी पदवीच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश देण्याचा निर्णय राज्य शासनाने १८ जून २०१५ मध्ये घेतला होता. त्यामुळे आता अचानक हा निर्णय रद्द केल्यामुळे २२७ तंत्रनिकेतनमधील आठ हजार विद्यार्थी अडचणीत आलेले आहेत. कृषी पदवीला व्यावसायिक दर्जा देताना तंत्रनिकेतनला वगळण्यात आले. त्यामुळे आता विद्यार्थ्यांचे एक वर्ष वाया जाणार आहे, अशी भूमिका विद्यार्थी प्रतिनिधी आनंद लोखंडे यांनी मांडली.

‘‘नव्या नियमानुसार कृषी तंत्रनिकेतनच्या चालू तीन तुकड्यांची अडचण झाली आहे. मुळात हा मुद्दा कृषी विद्यापीठांच्या अखत्यारित आहे. तथापि, याबाबत सहानुभूतिपूर्वक काही बाबींचा फेरविचार करण्यासाठी परिषदेकडून सूचना दिल्या जातील,’’ असे श्री. जगताप म्हणाले. कृषी पदवीच्या दुसऱ्या वर्षासाठी पूर्वीप्रमाणेच तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांना पात्र धरावे, अन्यथा दहा लाख रुपये भरपाई द्यावी, श्रेयांक भारात सूट देण्यासाठी अधिष्ठाता समितीने विचार करावा, जून २०१९ मध्ये तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सेमिस्टर पद्धत ठेवावी, अशा मागण्यांचे निवेदन विद्यार्थ्यांनी या वेळी महासंचालकांना दिले.


सर्व प्रकारच्या मूळव्याधींवर फक्त

JOLLY वासीर

जेल आणि कॅप्सूल्स

- जीएमपी प्रमाणित
- शुद्ध आयुर्वेदिक
- पहिल्या दिवसापासून परिणाम
- काहीही दुष्परिणाम नाहीत




सर्व प्रमुख मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध। Helpline: 78143-66633



Sakal Media Group
Print | TV | Digital | Events

agrowon Events & Exhibitions

ज्ञानातून विकासाकडे आणि आधुनिकतेतून समृद्धीकडे नेणारे दर्जेदार कृषी प्रदर्शन

सकाळ ॲग्रोवन कृषी प्रदर्शन २०१८

आजपासून शुभारंभ

**जालना**

१९ ते २१ जानेवारी २०१८

स्थळ : आझाद मैदान, जालना - ४३१ २०३, वेळ : १० ते ७

प्रदर्शनाला अवश्य भेट द्या

कृषी प्रदर्शन चर्चासत्र वेळापत्रक

| वार व तारीख | वेळ | वक्ते | विषय |
|---|---|---|---|
| शुक्रवार (ता. १९) | दु. १२ ते २<br>दु. ३ ते ५ | डॉ. एम. बी. पाटील<br>श्री. अजय मोहिते | मोसंबी बहाराचे नियोजन<br>रेशीम शेती व्यवस्थापन व संधी |
| शनिवार (ता. २०) | दु.१२ ते २<br>दु. ३ ते ५ | डॉ. श्रीकांत सटाले<br>डॉ. बी. बी. भोसले | आधुनिक व व्यवसायिक शेळीपालन<br>बोंड अळीचे संकट - त्यावरील उपाय व कीड नियंत्रण |
| रविवार (ता. २१) | दु. १२ ते २<br>दु. ३ ते ५ | श्री. सी. व्ही. कुलकर्णी<br>श्री. हेमंत चव्हाण | मुक्त संचार गोठा आणि मूरघास निर्मिती व दुधाळ जनावर प्रजाती<br>सेंद्रीय शेतीची गरज - मार्केटींग व ब्रॅण्डींग व्यवस्थापन |

सहप्रायोजक

Chitale Genus ABS (India) Private Limited



एक झकास कृषी प्रदर्शन

**प्रदर्शनात पाहायला मिळेल -** ट्रॅक्टर्स, हार्वेस्टिंग यंत्रे, विविध प्रकारची अवजारे व कापणी यंत्र उत्पादक कंपन्या, जैविक कीटकनाशके, विद्राव्य खते, ग्रीन हाऊस टेक्नॉलॉजी आणि इम्प्लीमेंट्स, शेडनेट, पॉलिहाऊस, बियाणे उत्पादक टिश्युकल्चर, ठिबक व तुषार सिंचन, पॅकेजिंग आणि कोल्ड स्टोरेज इंडस्ट्रीज, ग्रेडिंग, वेईंग, सोर्टिंग अवजारे उत्पादक कंपन्या, बँका व कृषी शिक्षण संस्था, कृषी साहित्य प्रकाशन, कृषी संशोधन संस्था व शासनाचे व कृषी विभागाचे महिला शेतकरी बचत गट, फार्मर्स प्रोड्युसर कंपनी, सेंद्रिय शेतकरी गट, नर्सरी, कृषी आणि ‘आत्मा’ विभागाचे विविध गट

शेतकऱ्यांसाठी माहितीचा खजिना | आधुनिकतेकडे नेणाऱ्या तंत्रज्ञानाचा आविष्कार | कृषी क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचा सहभाग | परिसंवादाच्या दालनात नामवंत तज्ज्ञांचे, प्रगतशील शेतकऱ्यांचे दररोज मार्गदर्शन

Website - www.corporate.agrowon.com II www.agrowon.com II www.facebook.com/agrowon